# शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

**दालनक्र.१७, जिल्हापरिषदपालघरइमारत, कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.) ४०१४०४**

ईमेल आयडी :- edu.palghar@gmail.com कार्यालयदुरध्वनीक्रमांक :- **०२५२५-२०५४११**

**संदर्भ** :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय सीईटी २०१५/प्र.क्र.१४९/ टीएनटी-१ दि.२७/०२/२००३

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय सीईटी २०१५/प्र.क्र.१४९/ टीएनटी.१ दि. ०७/०२/२०११

३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०११ /प्रक्र १०६४/२०११/१६ब, दि.१२/१२/२०११

४. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र.पीआरई/ (८६/१३) प्राशि-५ दि.१९/०६/२०१३

५. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय सीईटी २०१५/प्र.क्र.१४९/टोएनटी-१ दि. २३/०६/२०१७

६. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्रक्र३१८/टिएनटी-१ दि.०१/०१/२०१९

७. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय संकीर्ण /२०१८/प्रक्र.३९०/टिएनटी.१ दि.०९/०१/२०१९

८. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय संकीर्ण/२०१८/प्रक्र३९७/टिएनटी-१ दि.०७/०२/२०१९

९. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय संकीर्ण/२०१८/प्रक्र३९७/टिएनटी-१ दि.२५/०२/२०१९

१०. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय संकीर्ण/२०१८/प्रक्र३९७/टिएनटी-१ दि.१६/०५/२०१९

११. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय शुध्दीपत्रक संकिर्ण-२०१८प्रक्र३९७/टिएलटी-१ दि.१२/०६/२०१९

१२. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्रक्र१०६/टिएनटि-१ दि.१०/११/२०२२

१३. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. सनवि-२०२३/प्रक्र१४/कार्या१२ दि.०३/०३/२०२३

१४. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२३/प्रक्र५०९/टिएनटि-१ दि.१३/१०/२०२३

१५. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्रक्र२६०/टिएनटि-१ दि.०७/०२/२०२३

१६. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण- २०२३/प्रक्र१५१/टिएनटि-१ दि.०९/०६/२०२३

१७. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण- २०२३/प्रक्र१७४/टिएनटि-१ दि.२१/०६/२०२३

१८. मा.आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्रमांक आस्था/प्राथ.१०६/शा.प.पेसा पदभरती/ २०२३, दि.१७/०८/२०२३ व प्राप्त मार्गदर्शक सूचना

१९. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण: २०२०/प्र. क्र.२६०/टीएनटि-१, दि.०७/०२/२०२३

२०. सामान्य प्रशासन विभागांकडील शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२३/प्र.क्र.५४/आरक्षण-५, दि.०५/१०/२०२४

२१. दि.०५/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार या कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात आलेले तात्पुरत्या स्वरूपातील मानधन तत्वावरील नियुक्ती आदेश.

२२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. १२६९/२०२५ च्या अनुषंगाने दिलेला निर्णय दिनांक २५/०३/२०२५

२३. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२३/ प्र.क्र.५४/आरक्षण-५, दि.११/०२/२०२६

२४. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र. जा.क्र.आस्था/प्राथ.-१०६/शा.प.४८/ २०२६/१७४१६३६ दिनांक २५/०२/२०२६

२५. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व यांचेकडील सद्यस्थितीत हजर उमेदवारांचाअहवाल.

२६.या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक - २६ /०२/२०२६

*********************************************************************************************************************************

जा.क्र.पाजिप/शिक्षण/प्राथ/आस्था-५/वशी- ११६ / २०२५-२६ /२८० दिनांक :- २६ / ०२ /२०२६

*********************************************************************************************************************************

**नियुक्ती आदेश**

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व शासन परिपत्रकान्वये शासनस्तरावरून अनुसूचित जमाती क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील पदे मानधन तत्वावर भरणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने या कार्यालयाकडून संदर्भ क्र. २१ व २२ अन्वये एकुण ८४८ अनुसूचित जमातीच्या पात्र ठरलेल्या उमेदवारांना रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आलेली होती. परंतू सद्यस्थितीत संदर्भ क्र. २३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार अनुसूचित जमाती क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गाच्या पेसा क्षेत्रातील रिक्त पदांसाठी पदभरती प्रक्रिया राबविताना दिनांक ०५/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मानधन तत्वावर नियुक्ती दिलेल्या उमेवारांच्या गुणवत्तेनुसार नियुक्तीची कार्यवाही प्रथम करण्यात यावी असे नमुद आहे.

तसेच संदर्भ क्र. २४ च्या पत्रामध्ये मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या निर्देशाच्या अधिन राहून संदर्भ क्र. २१ व २२ अन्वये नियुक्ती दिलेल्या ८४८ उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार उपलब्ध झालेल्या रिक्त पदांचा विचार करून दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील आरक्षण धोरणाच्या मर्यादेत खालील तक्त्यात नमुद **इ.६ वी ते ८ वी च्या गटातील समाजशास्त्र विषयाच्या २६ उमेदवारांना** दिनांक २६/०२/२०२६ पासून दिनांक २५/०२/२०२९ या तीन वर्षांच्या कालावधीकरीता शासन नियमानुसार रक्कम रू. १६,०००/- एवढ्या एकत्रित मानधनावर शिक्षणसेवक म्हणून संदर्भ क्र. १ ते २५ च्या व अटी/शर्तींच्या अधिन राहून या आदेशान्वये नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा गट | विषय | मुळ जात प्रवर्ग | नियुक्तीचा जात प्रवर्ग | देण्यात आलेली पदस्थापना | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | तालुका | जि. प. शाळा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | निलेश पावलुश ठाकरे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | कवाडा ठाकरपाडा |
| २ | निलेश लक्ष्मण ठाकरे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | अणवीर पाटीलपाडा |
| ३ | विनायक जानू बाबर | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | डहाणू | धानिवरी |
| ४ | मनिषा जोसेफ निमडा | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | डहाणू | धुंदलवाडी |
| ५ | महेंद्र सुरेश धोडी | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | वेवजी सोनारपाडा |
| ६ | प्रमिला गोपाळ बारात | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | इंदगाव |
| ७ | प्रवीण शांताराम तांबडा | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | सुकसाळे |
| ८ | विनोद लहू कोरडे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | खडकी |
| ९ | अंजीना बाबू धोडी | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | गिरगाव आरजपाडा |
| १० | कृष्णा गोपाळ गोलवड | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | मोखाडा | गोमघर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | रिना दामू धोडी | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | घिमाणीया वंजारपाडा |
| १२ | विलास बबन खुताडे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | मोखाडा | केंद्रशाळा मोखाडा |
| १३ | गुरुनाथ सोनू म्हसे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | खांड |
| १४ | संदिप गोविंद भोये | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | बालापूर |
| १५ | सरिता वसंत साठे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | डहाणू | किन्हवली कामडीपाडा |
| १६ | कल्पना शिरीष वरखंडे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | शेतकीशाळा मराठी |
| १७ | निलम सुरेश थापड | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | बांधन |
| १८ | रामदास गोविंद बोरसे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | मोखाडा | पिंपळपाडा हिरवे |
| १९ | पंकज यशवंत तांबडा | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | तलासरी | उधवा मराठी |
| २० | शकुंतला अनंत बांडे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | सवादे |
| २१ | अविनाश जयराम वळवी | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | डहाणू | रानशेत |
| २२ | विजय भाऊ ओझरे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | विक्रमगड |
| २३ | मंगेश गणपत पवार | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | पालघर | शिगाव |
| २४ | अंत्या जगन शिंगाडा | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | डहाणू | सरावली दळवीपाडा |
| २५ | सुरेश अनाजी मौळे | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | मोखाडा | मो-हांडा |
| २६ | प्रवीण पांडुरंग भुसारा | इ. ६वी ते ८वी | समाजशास्त्र | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती | विक्रमगड | पाटीलपाडा बो-हांडा |

**अटी व शर्ती:-**

१. उपरोक्त तक्त्यातील नियुक्ती दिलेल्या शिक्षणसेवकांनी पदस्थापनेच्या शाळेवर ३० दिवसाच्या आत हजर होणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत नियुक्तीचे ठिकाणी हजर न झाल्यास आपली नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

२. सदरची नियुक्ती ही सर्वस्वी मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. भविष्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

३. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून शासन स्तरावरून अनुसूचित जमाती क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील पदांच्या पेसा क्षेत्रातील

पदभरती प्रक्रियाबाबतच्या प्राप्त होणा-या शासन निर्णय/परिपत्रक/पत्र व मार्गदर्शक सूचना/निर्देश याच्या अधिन राहून सदरची नियुक्ती देण्यात येत आहे.

४. या आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची सर्व मुळ कागदपत्रे पदस्थापना दिलेल्या तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांचे कार्यालयास तपासणीकरीता उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी संबंधित उमेदवारांच्या सर्व मुळ कागदपत्रांची तपासणी करून उमेदवार नियुक्तीकरीता पात्र ठरत असल्याची खात्री करूनच उमेदवारास पदस्थापनेच्या ठिकाणी हजर करून घेण्याची कार्यवाही करावी. कागदपत्र तपासणीअंती उमेदवार अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालयास अहवाल सादर करण्यात यावा.

५. या आदेशान्वये दिलेल्या नियुक्तीवर उमेदवाराचा कोणत्याही स्वरूपाचा नियुक्ती कायमस्वरूपी असल्याचा हक्क/अधिकार राहणार नाही.

६. शिक्षण सेवकांना दरमहा रु.१६,०००/-(अक्षरी रक्कम रु. सोळा हजार मात्र) मानधनावर काम करावे लागेल. त्या शिवाय इतर कोणतेही अतिरिक्त भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

७. नियमित शिक्षकांना असणा-या कोणत्याही प्रकारच्या रजा शिक्षण सेवकांना असणार नाहीत. महीला शिक्षण सेवकबाबत प्रसुती रजा देय असेल अन्य कोणत्याही प्रकारच्या रजा असणार नाहीत.

८. शिक्षणसेवकाच्या कालावधीमध्ये शिक्षणसेवकांनी रजा उपभोगल्यास रजेचा कालावधी वगळून कार्यरत तीन वर्षाचा कालावधी गणण्यात येईल.

९. आपली नियुक्ती ज्या प्रवर्गातुन /समांतर आरक्षणातून करणेत आली आहे. त्यासंबधी सक्षम दस्तऐवज वैध अवैध यांचे निर्णयास अधीन राहुन करण्यात आली आहे. भविष्यात सदरील प्रमाणपत्र अवैध ठरल्यास नियुक्ती आदेश रद्द करणेत येईल.

१०. ज्या उमेदवारांची निवड आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे. अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याचे आत जात वैधता पडताळणी समिती कडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील, जातपडताळणी समिती कडील पोहोच (साक्षांकित प्रत) नियुक्ती प्राधिका-यास सादर करणे बंधन कारक राहील.

११. आपली शिक्षण सेवक म्हणून केलेली नियुक्ती ही आपण प्रत्यक्ष नियुक्तीचे ठिकाणी हजर झालेपासुन सलग तीन वर्षे कालावधीसाठी राहील.

१२. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू राहील.

१३. नियुक्तीचे कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती रद्द करणेचा अधिकार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

१४. शिक्षण सेवक म्हणून सेवेत हजर झाल्यापासुन MSCIT किवा समकक्ष संगणक परीक्षा (२ वर्षात) उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

१५. शिक्षण सेवक पदावर तीन वर्ष समाधानकारक काम केलेनंतरच आपणास प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती देणेस पात्र समजणेत येईल.

१६. शिक्षण सेवकाला राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी १ महिन्याची पूर्वसुचना नियुक्ती प्राधिकारी यांना देणे आवश्यक राहील, शिक्षण सेवकाने राजीनामा किंवा नोकरी स्वत:हुन मध्येच सोडून दिल्यास मागील सेवेचा लाभ ३ वर्षाच्या कालावधी परिगणित करताना मिळणार नाही, तसेच शा.नि.दि.२१/०६/२०२३ मधील मुद्दा क्र. ०४ अन्वये जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणसेवक पदावर नव्याने नियुक्ती झालेल्या उमेदवारांस जिल्हा बदलीचा हक्क राहणार नाही.

१७. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांची नियुक्ती ही त्यांनी या कर्यालयास सादर केलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी प्रामणपत्राच्या आधीन राहून करण्यात आली आहे. त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांना सेवेतून तात्काळ कमी करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१८. आपली नियुक्ती झाल्यानंतर दोन महिन्याच्या कालावधीत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैदयकिय दृष्ट्या पात्र असले बाबतचे प्रमाणपत्र गटशिक्षणधिकारी यांचे कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१९. संबंधित उमेदवारांनी ३० दिवसाचे आत नियमानुसार चारित्र्य पडताळणी सक्षम जिल्हा पोलिस अधिक्षक यांचेकडील प्रमाणपत्र संबंधित गटशिक्षणाधिकारी कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करावयाचे आहे.

२०. रुजू दिनांकास माध्यमिक शालांत परिक्षा मराठी व हिंदी भाषा या विषयासह उत्तीर्ण नसल्यास एतदर्थ मंडळाची

मराठी व हिंदी परिक्षा नेमणुकीच्या दिनांका पासुन ३ वर्षाच्या मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२१. ज्या शिक्षण सेवकांची इंग्रजी माध्यमातून व्यावसायीक अर्हता धारण करुन नियुक्ती करणेत आलेली आहे. अशा शिक्षण सेवकांच्या नियुक्ती नंतर शिक्षण सेवक कालावधीमध्ये त्यांची कौशल्य चाचणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, म.रा. पुणे यांच्या अधिनस्त प्रादेशिका विदया प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या इंग्रजी भाषेशी संबधित संस्थेकडून घेण्यात येणार आहे. सदर कौशल्य चाचणीतील गुणवत्तेनुसार संबधित शिक्षण सेवकांचे कौशल्य ज्ञान असमाधानकारक असल्याचे आढळल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

२२. मानधन तत्वावरील नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाची गैरवर्तणूक केल्यास आपणास कोणतीही पूर्व सूचना न देताआपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२३. शाळेमध्ये व शाळेच्या आवारामध्ये मद्य, तंबाखू तसेच तंबाखूजन्य पदार्थ बाळगणे व सेवन यावर पूर्णपणे बंदी घालण्यात येत आहे, असे करतांना कोणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

२४. सदर नेमणुका ह्या शासनाच्या निर्देशाप्रमाणे एकत्रित मानधन तत्वावर देण्यात आलेली आहे.

२५. सदरच्या नियुक्तीवर उमेदवारांचा कोणत्याही प्रकारचा कायम स्वरूपाचा हक्क असणार नाही.

२६. नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील.

- संबंधित गावातील शाळेत जाण्या योग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करून घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.
- शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे.
- अभ्यासक्रमामध्ये नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.
- नेमून दिलेल्या वर्गाचे / वर्गांचे विहित कार्यपद्धती नुसार अध्यापन करणे.
- शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.
- शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व त्यांच्या आदेशाचे पालन करणे.
- वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपुर्ण व सर्वंकष मुल्यमापन करणे व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे.
- शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या आयोजनामध्ये सहभागी होणे.
- शिक्षणाधिकारी यांनी व वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे.

26/2/2026

**(मनोज रानडे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-**

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पालघर/ वसई/ तलसरी/ डहाणू/ वाडा/ विक्रमगड/ जव्हार/ मोखाडा.
३. गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती पालघर/ वसई/ तलसरी/ डहाणू/ वाडा/ विक्रमगड/ जव्हार/ मोखाडा.
४. आस्थापना नस्ती.

26/2/2026

**(मनोज रानडे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**